67
2013

# महाराष्ट्र शासन

क्रमांक: टिपीबी-४३१२/६४५/प्र.क्र.६८/२०१२/नवि-११
नगर विकास विभाग, निर्मल भवन
२ रा मजला, नरीमन पॉईंट, मुंबई -३२
दिनांक : १७ /१०/२०१३.

प्रति,
आयुक्त,
बृहन्मुंबई महानगरपालिका,

विषय :- न.भु.क्र. १४४८/८/अ व १४४८/८/ड मौजे एक्सर, बोरीवली, मुंबई या खाजगी भूखंडावरील बहुमजली सार्वजनिक वाहनतळाच्या प्रकल्पास मंजूरी मिळण्याबाबत.
संदर्भ :- प्रमुख अभियंता ( रस्ते, वाहतूक व पुल), बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे पत्र क्र. सीएचई /५०१/ एसआर /रस्ते, वाहतूक व पुल, दि. २७/९/२०१२.

महोदय,

प्रमुख अभियंता (रस्ते, वाहतूक व पुल), बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे संदर्भाधीन दि.२७/९/२०१२ रोजीचे प्रस्तावाचे अवलोकन होणेस विनंती आहे.

बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावलीतील विनियम ३३(२४) नुसार न.भु.क्र. १४४८/८/अ व १४४८/८/ड, मौजे एक्सर, बोरीवली, मुंबई या खाजगी भूखंडावरील बहुमजली सार्वजनिक वाहनतळाच्या प्रकल्पास मंजूरी मिळण्याच्या प्रस्तावास विनियम ३३(२४) अंतर्गत गठीत समितीने दि. २६/७/२०११ रोजीच्या बैठकीमध्ये मान्यता दिलेली असून सदर प्रस्तावाची शिफारस शासनास केलेली आहे. सदर प्रस्तावानुसार ६ हलकी वाणिज्य वाहने व २० लहान बसेस मिळून २६ हलकी वाणिज्य वाहने (LCVs) व १६८ हलकी वाहने (LMVs)अशा एकूण १९४ वाहनांकरिता मिळून १४५६४.०९ चौ.मी वाहनतळाचे क्षेत्रफळ विचारात घेणेस शिफारस करण्यात आली आहे. सदर वाहनतळाचे क्षेत्र महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७(१अेअे) खाली शासनाकडून प्रसिध्द करण्यात आलेल्या सूचना क्र. टीपीबी-४३१०/९४८/प्र.क्र. २८९/२०१०/नवि-११, दि. १९/३/२०१२ अन्वये अधिसूचित फेरबदलाच्या तरतुदीनुसार एकूण १०,०९०.०० चौ.मी. अनुज्ञेय असून त्यानुसार खालील नमूद अटी व शर्तींच्या अधिन राहून सदर सार्वजनिक वाहतनळाच्या प्रस्तावास शासनाची तत्वत: मान्यता प्रदान करण्यात येत असल्याचे आपणास कळविण्याचे मला आदेश आहेत.

<u>अटी :-</u>

१) बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावलीमधील विनियम ३३(२४) च्या मंजूर तरतुदी व शासनाने क्र. टीपीबी-४३१०/९४८/प्र.क्र.२८९/२०१०/ नवि-११, दि. १९/३/२०१२ च्या सूचनेन्वये महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१अेअे) अन्वये प्रसिध्द केलेल्या विनियम ३३(२४) मधील प्रस्तावित सुधारणा यामधील कठोरत्तम तरतुदी सद्य:स्थितीत अंमलात राहतील. सदर तरतुदीनुसार प्रस्तुत प्रकरणी अधिमुल्याची रक्कम परिगणीत करुन विकासकाकडून वसूल करावी व त्यापैकी ५०% रक्कम शासनाने विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार शासनाकडे भरणा करण्याची दक्षता घ्यावी.

D:\CAMP UD-11\UD-11\LETTER\KIRAN\LETTER.Doc

२) सुविधा क्षेत्र / आरक्षित क्षेत्र यावर सार्वजनिक वाहनतळ प्रकल्प अनुज्ञेय राहणार नाही.

३) प्रस्तुत प्रकरणी जागा मुंबई उपनगरामध्ये स्थित असून एकत्रित इमारतीमध्ये सार्वजनिक वाहनतळाचा प्रकल्प नियोजीत असल्याने विनियम ३३(२४) नुसार ४०% प्रोत्साहनात्मक चटई क्षेत्रासह संदर भूखंडावर कमाल २.५० चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय राहील.

४) वाहनतळाखालील क्षेत्र हे चटई क्षेत्रात हिशोबित होणार नाही.

५) प्रस्तावित सार्वजनिक वाहनतळासह रहिवास वापराच्या इमारतीचा एकत्रित (Composite) समावेश असलेल्या प्रस्तावित इमारतीसाठी "हाय राईज कमिटी" चे ना-हरकत प्रमाणपत्र घेवूनच प्रस्तावित इमारतीचे आराखडे मंजूर करण्यासंबंधी निर्णय आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी घ्यावयाचा असून आयुक्त विहित करतील त्या अटी / शर्ती सापेक्ष नियोजित विकास अनुज्ञेय राहील.

६) प्रमुख अभियंता ( विकास नियोजन) बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे पत्र क्र. सी.एच.ई./अे ४५४१/बी.पी. (डब्ल्यू.एस.) अेआर, दिनांक २४/१२/२०१२ च्या स्पष्टीकरणानुसार इमारतीची 'सी' विंग ही Existing Club Activities या वापरासाठी राखीव ठेवण्यात येईल असे महानगरपालिकेकडून सुनिश्चित करण्यात यावे. तसेच भूखंडाचे क्षेत्रफळाबाबत अभिलेखानुसार पडताळणी करण्यात यावी.

७) संबंधित जमिन मालक/ विकासक/ सोसायटी/ कंपनी यांना उक्त सार्वजनिक वाहनतळाचे व्यवस्थापन (operation) करणे अनुज्ञेय राहणार नाही.

आपला,

(स्वाक्षरी)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत —१) प्रमुख अभियंता ( रस्ते वाहतूक व पुल), बृहन्मुंबई महानगरपालिका.
२) उपसंचालक नगर रचना, बृहन्मुंबई.
३) निवड नस्ती.

D:\CAMP UD-1\UD-1\LETTERS\KIRAN\LETTER.Doc